शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

अधिक मास अधिक खास
ऑफर कालावधी १७ मे २०२६ ते १५ जून २०२६
चांदीची जोडवी 100% मजुरीवर सूट
काजळे ज्वेलर्स
9601 222 777
9615 222 777
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १३६ । किंमत - २ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । शनिवार । ०६/०६/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

# निवडणूक बिनविरोध

## घोडेबाजाराला लगाम, नगरसेवकांचा हिरमोड



युवावार्ता (प्रतिनिधी)

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत अखेर बिनविरोधाचा फॉर्म्युला यशस्वी ठरल्याने संभाव्य घोडेबाजाराला लगाम बसला आहे. मात्र या निवडणुकीतील मतदार असलेल्या महापालिका, नगरपरिषद व नगरपंचायतीतील अनेक नगरसेवकांच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले असून त्यांच्या हातात येणारी लक्ष्मी ऐनवेळी हुकल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

निवडणुकीची घोषणा होताच मतदार असलेल्या नगरसेवकांचे महत्त्व अचानक वाढले होते. निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता व्यक्त होत असताना एका मतासाठी लाखोंची बोली लागेल, अशा चर्चा राजकीय गोटात सुरू होत्या. काही ठिकाणी एक मत पाच ते दहा लाखांपर्यंत जाऊ शकते, असे अंदाज वर्तविले जात होते. मात्र उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी वरिष्ठ पातळीवर झालेल्या राजकीय घडामोडींमुळे चित्रच पालटले. अपक्ष उमेदवार करण ससाणे यांच्यासह इतर इच्छुकांनी माघार घेतल्याने भाजपचे प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली.

निवडणूक बिनविरोध झाल्याने संभाव्य आर्थिक व्यवहारांच्या चर्चांनाही पूर्णविराम मिळाला. त्यामुळे काही नगरसेवकांचा मोठा भ्रमनिरास झाल्याचे बोलले जात आहे. सर्वसामान्य मतदारांना निवडणुकीत हजार-दोन हजार रुपये वाटणारे काही नगरसेवक स्वतः मतदार बनल्यावर मात्र आपल्या मताची किंमत लाखोंमध्ये मोजत असल्याची उपरोधिक चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. दरम्यान, हातात आलेला घास तोंडात जाण्यापूर्वीच निसटला, अशी भावना काही नगरसेवकांमध्ये असल्याचे बोलले जात आहे. निवडणूक बिनविरोध झाल्यानंतर आता नव्या आमदारांकडून किमान चहापाणी तरी मिळणार का, यावरही राजकीय वर्तुळात मिश्किल चर्चा रंगू लागली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये वारंवार चर्चेत येणाऱ्या घोडेबाजाराच्या शक्यतांना यावेळी पूर्णविराम मिळाला असला, तरी नगरसेवकांच्या अपेक्षांवर मात्र विरजण पडल्याचे चित्र दिसून येत आहे.

# संगमनेरमध्ये वाढत्या अपघातांचा धोका

## बंद पडणारे सिग्नल, तुटलेले गतीरोधक आणि प्रशासनाचे दुर्लक्ष

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर हे अहिल्या नगर जिल्ह्यातील वेगाने विकसित होणारे शहर म्हणून ओळखले जाते. शहराचा विस्तार, वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या आणि व्यापारी हालचाली यामुळे वाहतुकीचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र या वाढत्या वाहतुकीचे नियोजन आणि रस्ते सुरक्षेच्या उपाययोजनांकडे संबंधित प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष नागरिकांच्या जीवाशी खेळणारे ठरत आहे. विशेषतः लाईट गेल्यानंतर बंद पडणारे वाहतूक सिग्नल, अनेक ठिकाणी तुटलेले डिव्हायडर, खराब झालेले व अपघाताला निमंत्रण देणारे प्लॅस्टिकचे गतीरोधक आणि त्यांची देखभाल न होणे यामुळे अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे.





शहरातील नाशिक पुणे महामार्गावर बसस्थानकाजवळ, दिल्ली नाका, अकोले नाका येथे बसविण्यात आलेले वाहतूक सिग्नल वाहतूक नियंत्रणासाठी महत्त्वाचे साधन आहेत. मात्र वीजपुरवठा खंडित झाला की हे सिग्नल पूर्णपणे बंद पडतात. अनेक शहरांमध्ये सिग्नल यंत्रणेला बॅटरी बॅकअप किंवा सौरऊर्जेची जोड दिलेली असते, त्यामुळे वीज नसतानाही वाहतूक नियंत्रण सुरू राहते. संगमनेरमध्ये मात्र अशी व्यवस्था नसल्याने सिग्नल बंद पडताच या चौकांमध्ये गोंधळ उडतो. या सिग्नल जवळ कधीही वाहतूक पोलीस नसतात त्यामुळे वाहनचालक स्वतःच्या अंदाजाने वाहने चालवू लागतात आणि याच गोंधळातून अपघात घडतात.

विशेषतः नाशिक-पुणे महामार्गाला जोडणाऱ्या चौकांमध्ये आणि गर्दीच्या वेळी सिग्नल बंद पडल्यास परिस्थिती अधिक गंभीर बनते. दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी आणि पादचारी यांना रस्ता ओलांडणे धोकादायक ठरते. अनेक वेळा किरकोळ अपघात घडूनही प्रशासनाकडून त्याची गंभीर दखल घेतली जात नाही.

याशिवाय शहरातील अनेक रस्त्यांवरील डिव्हायडर तुटलेल्या अवस्थेत आहेत. काही ठिकाणी डिव्हायडरवरील रंग उडाले आहेत, तर काही ठिकाणी लोखंडी संरचना बाहेर आलेली दिसते. रात्रीच्या वेळी अशा डिव्हायडरची स्पष्ट दृश्यता नसल्यामुळे वाहनचालकांना त्याचा अंदाज येत नाही. परिणामी वाहने थेट डिव्हायडरवर आदळण्याच्या घटना घडतात. काही ठिकाणी नागरिकांनी सोयीसाठी डिव्हायडरमध्ये अनधिकृत मार्ग तयार केले आहेत. त्यामुळे अचानक समोरून येणाऱ्या वाहनांचा अंदाज न आल्याने अपघाता होतात. (पान २वर)

# डॉ. सुधीर तांबे साने गुरुजी जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित



युवावार्ता ( प्रतिनिधी )

संगमनेर- जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक व पुरोगामी विचारांचे पाईक असलेले आणि सर्वसामान्यांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे नेता नव्हे मित्र अशी राज्यभर ओळख असलेले नाशिक पदवीधर मतदार संघाचे मा.आमदार डॉ. सुधीर तांबे यांना अत्यंत प्रतिष्ठेच्या साने गुरुजी जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

पुणे येथील साने गुरुजी स्मारक सिंहगड येथे राष्ट्रसेवा दलाच्या वतीने त्यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या मार्गदर्शिका डॉ. शैलाताई नरेंद्र दाभोळकर, माजी आमदार शिरीष चौधरी, माजी आमदार कपिल पाटील, ॲड सुरेश ठाकूर, चित्रपट निर्माते नितीन वैद्य, साजदा निहाल अहमद, डॉ. भीमराव आंबेडकर, हेमंत नाईकनवरे, जयवंत पाटील, अजित शिंदे, राजा कांदळकर, अतुल देशमुख, जाकीर अत्तार, अरविंद सावला, सुनील यादव आदी उपस्थित होते. शाल श्रीफळ मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन माजी आमदार डॉ. सुधीर तांबे व सौ. दुर्गाताई तांबे यांना राष्ट्रसेवा दलाच्यावतीने सन्मानित करण्यात आले. या सत्कार कार्यक्रमात प्रसिद्ध कवी प्रा. अरुण म्हात्रे यांनी मा.आमदार डॉ.सुधीर तांबे यांची प्रकट मुलाखत घेतली.

यावेळी बोलताना मा. आ. डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, लहानपणापासूनच आमच्या घरात पुरोगामी विचारांचे वातावरण होते. मामांकडे असताना महात्मा फुले यांच्या जीवनावरील पुस्तक वाचले आणि त्यांच्या विचारांप्रती आकर्षण निर्माण झाले. मोठे वैचारिक परिवर्तन होण्यामध्ये येथून सुरुवात झाली लहानपणी आम्ही संगमनेर येथील रंगारगल्लीमध्ये राहत असायचो. त्यावेळी अनेक मोठ्या नेत्यांचा सहवासाला लाभला. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात, बी. जे. खताळ पाटील, भास्करराव दुर्वे नाना यांचा सहवास लाभला व त्यांना पाहत आलो.

फर्ग्युसन कॉलेज येथे शिकत असताना पुणे येथील साने गुरुजी प्रतिष्ठानला भेट द्यायचो. यावेळी ही वैचारिक चर्चा आमच्या व्हायच्या. संगमनेर मध्ये एम एस सर्जन असताना चांगली प्रॅक्टिस सुरू होती. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांचे आदर्श संस्कार आमच्यावर झाले. शिस्त प्रामाणिकपणा त्यांनी आयुष्यभर जोपासली कधीही राजकारणासाठी (पान २ वर)

# दिल्लीत शनिवारी 'कॉक्रोच' एल्गार

## शिक्षण मंत्र्यांवर राजीनाम्याचा दबाव वाढवणार

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

सोशल मीडियावर प्रचंड धुमाकूळ घालणाऱ्या 'कॉक्रोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके हे अमेरिकेतून भारतासाठी रवाना झाले आहेत. दिल्लीत शनिवार ६ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या एका मोठ्या विरोध प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी ते भारतात येत आहेत. भारतासाठी निघण्यापूर्वी त्यांनी सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट केली असून, मी भारतासाठी निघालो आहे. मी माझे भविष्य संविधानाच्या हाती सोपवतो, जय भीम! असे त्यांनी म्हटले आहे.




अभिजीत दीपके शनिवारी सकाळी दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर लँड करतील. विमानतळावर उतरल्यानंतर ते थेट पार्लियामेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यात जाणार असून जंतर-मंतर येथे आंदोलनासाठी अधिकृत परवानगीची मागणी करणार आहेत. कारण या आंदोलनासाठी अद्याप दिल्ली पोलिसांकडून परवानगी मिळालेली नाही. 'नीट' पेपर लीक प्रकरण आणि सीबीएसई परीक्षा निकालांमधील गडबडीच्या विरोधात हे आंदोलन केले जात असून, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी प्रमुख मागणी या पक्षाची आहे. अभिजीत दीपके यांनी दावा केला आहे की, त्यांच्या पक्षाचे ११ लाखाहून अधिक नोंदणीकृत सदस्य झाले असून वेबसाइटच्या माध्यमातून त्यांच्याशी संपर्क झाला आहे. त्यामुळे दिल्लीतील आंदोलनात हजारो समर्थक एकत्र येण्याची शक्यता आहे. (पान २ वर)










Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# आश्वी परिसरात वृक्षतोडीचा धुमाकूळ

## मौल्यवान झाडांची राजरोस कत्तल




युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - प्रवरा नदी त्या नदीवर दोन कालवे आणि निळवंडे धरणाच्या दोन कालव्यांमुळे सदैव हिरवागार आणि समृद्ध राहिलेला आश्वीचा बागायती पट्टा सध्या एका वेगळ्याच कारणाने होरपळत आहे. परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वृक्षतोड सुरू असून, वर्षानुवर्षे उभी असलेली मौल्यवान झाडे काही मिनिटांत भुईसपाट केली जात आहेत. या संपूर्ण 'लाकूड बाजारा'मागे मोठे आर्थिक रॅकेट सक्रिय असल्याची चर्चा असून, वन विभागाच्या संशयास्पद भूमिकेवर आता पर्यावरणप्रेमींनी थेट बोट ठेवले आहे.

### उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**पर्यावरणाचा समतोल बिघडवणाऱ्या या गंभीर प्रकारामुळे आश्वी परिसरातील निसर्गप्रेमींमध्ये तीव्र संताप आहे. या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ आणि उच्चस्तरीय चौकशी करून, या रॅकेटमधील मुख्य सूत्रधार आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी लावून धरली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.**

आधुनिक यंत्रांनी मिनिटांत कत्तल; मोठ्या शहरांकडे वाहतूक ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, लिंब, चिंच, जांभूळ यांसारख्या पिढ्यानपिढ्या जतन केलेल्या मौल्यवान वृक्षांना लक्ष्य केले जात आहे. आधुनिक कटर आणि यंत्रसामग्रीच्या सहाय्याने अवघ्या काही मिनिटांत ही झाडे तोडली जातात. भरदिवसा लाकडाने गच्च भरलेली वाहने आश्वी परिसरातून बाहेर पडत असून, ही लाकडे थेट मोठ्या शहरांतील बाजारपेठेत पाठवली जात आहेत. हे सर्व सुरू असतानाही संबंधित यंत्रणा डोळे झाकून का बसली आहे? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

### वन विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

मागील महिन्यात झालेल्या वादळामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग आणि इतर शासकीय जागांवरील अनेक जुनी झाडे उन्मळून पडली होती. नियमानुसार या पडलेल्या झाडांचा सविस्तर पंचनामा आणि शासकीय नोंद होणे गरजेचे होते. मात्र, या लाकडाची विल्हेवाट नेमकी कशी लावली गेली? याची कोणतीही पारदर्शक माहिती समोर आलेली नाही. यामध्ये मोठी अनियमितता झाल्याचा दाट संशय ग्रामस्थांकडून व्यक्त केला जात आहे.

एकीकडे राज्य शासन पर्यावरण संतुलनासाठी आणि वृक्षारोपणासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी पाणीसारखा वाहत आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा'च्या घोषणा दिल्या जात आहेत. मात्र, दुसरीकडे आश्वी परिसरात सुरू असलेल्या या राजरोस कत्तलीमुळे शासनाच्या मोहिमेलाच सुरुंग लागत आहे. खाजगी जमिनीवरील झाडेही कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता थेट तस्करांच्या घशात घातली जात असल्याचा आरोप हा

या बेसुमार वृक्षतोडीमुळे परिसरात आधीच सक्रिय असलेल्या लाकूड तस्करांचे मनोबल कमालीचे वाढले आहे. वन विभाग आणि संबंधित यंत्रणेच्या नाकाखाली हा सर्व प्रकार घडत असल्याने, यात अधिकारी आणि तस्करांचे काही साटेलोटे आहे का? अशी जाहीर चर्चा आता चौकाचौकात रंगू लागली आहे.

# जुन्या वाहनांसाठी HSRP अनिवार्य वाहनधारकांना ३० जूनची मुदत

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील लाखो वाहनधारकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ अंतर्गत सर्व शासकीय आणि खासगी वाहनांसाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट बसवणे अनिवार्य करण्यात आले असून, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना ३० जून २०२६ पर्यंत ही नंबर प्लेट बसवणे बंधनकारक आहे. याबाबत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बालाजी धनवे यांनी माहिती दिली आहे.

वाहनांची ओळख अधिक सुरक्षित करणे, बनावट नंबर प्लेट्सना आळा घालणे तसेच वाहन चोरीच्या घटनांवर नियंत्रण मिळवणे या उद्देशाने केंद्र सरकारने एचएसआरपी प्रणाली लागू केली आहे. त्यामुळे निर्धारित मुदतीत नंबर प्लेट न बसवणाऱ्या वाहनधारकांवर भविष्यात दंडात्मक कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट ही विशेष तंत्रज्ञानाने तयार करण्यात आलेली नंबर प्लेट असते. या प्लेटवर लेझर कोड, क्रोमियम आधारित होलोग्राम, कायमस्वरूपी लॉकिंग सिस्टम आणि युनिक ओळख क्रमांक असतो. त्यामुळे वाहनाची ओळख पटवणे अधिक सोपे होते आणि बनावट नंबर प्लेट तयार करण्यावर प्रभावी नियंत्रण मिळते.केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने ६ डिसेंबर २०१८ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, १ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांमध्ये एचएसआरपी नंबर प्लेट कंपनीकडूनच बसवून देणे अनिवार्य करण्यात आले होते. त्यामुळे त्या तारखेनंतर खरेदी झालेल्या वाहनांमध्ये ही सुविधा आधीपासून उपलब्ध आहे. मात्र, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या लाखो वाहनांमध्ये अद्याप पारंपरिक नंबर प्लेट्स असल्याने आता त्यांनाही क्व्ठझ बसवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्यातील विविध शासकीय कार्यालयांच्या ताब्यात असलेल्या वाहनांनाही हा नियम लागू करण्यात आला आहे. यासाठी सर्व विभागप्रमुखांना स्वतंत्र पत्राद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. कार्यालयांच्या अभिलेखावरील १ एप्रिल २०१९ पूर्वी खरेदी केलेल्या सर्व वाहनांवर ३० जून २०२६ पूर्वी एचएसआरपी बसवून त्याचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

# दरडग्रस्त-पूरग्रस्तांसाठी दिलासादायक निर्णय

## राज्यात नवे पुनर्वसन धोरण लवकरच

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील दरडप्रवण गावांचे कायमस्वरूपी पुनर्वसन, जुन्या प्रकल्पांमधील गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवणे आणि पूरग्रस्त भागातील गावांचे सुरक्षित स्थलांतर सुलभ करण्यासाठी राज्य सरकार लवकरच एक नवे आणि सर्वसमावेशक 'पुनर्वसन धोरण' आणणार आहे. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी गुरुवारी याबाबत माहिती दिली. या नव्या धोरणामध्ये आपद्ग्रस्तांना दिल्या जाणाऱ्या जागेच्या क्षेत्रफळात वाढ करणे, घरकुल अनुदानाच्या रक्कमेत वाढ करणे आणि पुनर्वसन वसाहतींमध्ये आधुनिक सोयी-सुविधांचा समावेश करणे या बाबींचा प्रामुख्याने समावेश केला जाईल, असे स्पष्ट करत हे धोरण कालानुरूप आणि सर्वसमावेशक असेल, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

मंत्रालयात आयोजित मदत व पुनर्वसन विभागाच्या उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते. विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल यांच्यासह व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मंत्री जाधव-पाटील यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट केले की, १४ ऑक्टोबर २०२२ च्या शासन निर्णयातील जुने निकष बदलून नागरिकांच्या हिताचे नवीन धोरण जलदगतीने तयार करण्यात येईल. तसेच हे नवीन धोरण आणल्यानंतर पुनर्वसनाचे सर्व आगामी प्रस्ताव स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच सुधारित स्वरूपात सादर केले जावेत, असे आदेश त्यांनी दिले.यंदा राज्यात पाऊस कमी पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवल्याच्या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने पाणी टंचाई निवारणाच्या उपाययोजनांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आगामी १५ ऑगस्टपर्यंतच्या पाणी वितरणाचे चोख नियोजन करावे. नागरिकांची पाण्यासाठी होणारी गैरसोय टाळण्यासाठी आवश्यकतेनुसार विहिरी अधिग्रहित कराव्यात; तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा करून गरज भासल्यास चारा छावण्यांचे रीतसर प्रस्ताव शासनाकडे सादर करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

# सलग तिसऱ्यांदा रेपो रेट जैसे थे

## गृहकर्जदारांना दिलासा

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा यांनी पतधोरण विषयक समितीच्या बैठकीनंतर रेपो रेट जाहीर केला. यावेळी त्यांनी गेल्या काही महिन्यात युद्धांमुळं निर्माण झालेली अनिश्चितता यासंदर्भात भाष्य केलं. सध्या निर्माण झालेल्या आर्थिक स्थितीचं सखोल विश्लेषण केल्यानंतर रेपो रेट ५.२५ टक्के कायम ठेवत असल्याचं संजय मल्होत्रा यांनी जाहीर केलं. आरबीआयनं सलग तिसऱ्यांदा रेपो रेट कायम ठेवत गृहकर्जदारांना दिलासा दिला आहे. गृहकर्जदारांना दिलासा मिळाला आहे. आरबीआयकडून रेपो रेट कायम ठेवला जाईल अशी अनेकांना आशा होती. त्यानुसार रेपो रेट ५.२५ टक्के कायम ठेवण्यात आला आहे. यामुळे व्याजदरात कोणतीही वाढ होणार नाही. आरबीआयने पतधोरण जाहीर करताना सलग तिसऱ्यांदा रेपो रेट कायम ठेवल्यानं गृहकर्जदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. रेपो रेट कमी न केल्यानं किवा त्यात वाढ न केल्यानं गृहकर्जाचा ईएमआय कायम राहणार आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सिद्धार्थ विद्यालयात वृक्षारोपण



युवावार्ता (प्रतिनिधी)

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त (दि. ५ जून) सिद्धार्थ विद्यालय, संगमनेर व महाराष्ट्र राज्य शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वखर्चाने आणलेली विविध वृक्षांची रोपे विद्यालय परिसरात लावण्यात आली. कार्यक्रमास सामाजिक वनीकरण विभागाच्या श्रीमती भरीतकर मॅडम व श्रीमती आठरे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक रघुनाथ जगताप हेही उपस्थित होते.

यावेळी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करताना मुख्याध्यापक रघुनाथ जगताप यांनी सांगितले की, कोरोनाच्या काळात निसर्गाने मानवाला स्वतःचे अनन्यसाधारण महत्त्व दाखवून दिले आहे. वृक्ष मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन निर्मिती करून पर्यावरणाचा समतोल राखतात आणि मानवी जीवनासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यामुळे प्रत्येकाने वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित या उपक्रमाबद्दल मुख्याध्यापक जगताप यांनी सामाजिक वनीकरण विभाग व महाराष्ट्र शासनाचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकाश पारखे, बाळासाहेब राऊत, गोरक्षनाथ राऊत, तुषार थिटे, दत्तात्रय गोफणे, सुशांत रूपवते आणि सुनील यादव यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डॉ. सुधीर तांबे साने गुरुजी जीवन...

पान १ वरून - तत्वांशी तडजोड केली नाही. काँग्रेसचा सहकाराचा विधायक मार्ग त्यांनी आयुष्यभर जपला. पुढे महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली काम करताना आम्ही हे व्रत कायम ठेवले. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनीही अत्यंत अडचणीच्या काळातही कधीही विचार सोडले नाही. ते विचारधारेशी कायम पक्के आहेत. माझे विचार स्पष्ट आणि प्रामाणिक आहे मी पुरोगामी विचारांचा पक्का कार्यकर्ता आहे. प्रतिगामी विचारांचे लोक भेटले तर चर्चा करण्यावर माझा भर असतो. लोकशाही मानणारा राज्यघटनेचा विचार घेऊन तरुणांच्या माध्यमातून विज्ञानवादी समाज घडवण्यासाठी आपले काम सुरू आहे. यापुढील काळातही हा राष्ट्र विचार पुढे नेऊ असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तर प्रा.कवी अरुण म्हात्रे म्हणाले की, महाराष्ट्राच्या राजकारणात राहून अत्यंत साधेपणा आणि सर्वांना बरोबर घेऊन जाणारे माजी आमदार डॉक्टर सुधीर तांबे यांचे व्यक्तिमत्व सर्वांना नेहमी भावते. विविध विषयांवरील त्यांचा अभ्यास हा तरुणांसाठी नक्कीच मार्गदर्शक ठरणारा असतो असे ते म्हणाले. यावेळी माजी आमदार शिरीष चौधरी, डॉ.शैलाताई नरेंद्र दाभोळकर, माजी आमदार कपिल पाटील यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी प्रा.हिरालाल पगडाल, अनिकेत घुले, दत्ता ढगे यांच्यासह संगमनेर मधील राष्ट्रसेवा दल व छात्र भारतीचे आणि जयहिंद युवा मंच विविध कार्यकर्ते उपस्थित होते.

# नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला झटका, आरबीआयची कारवाई

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला केंद्रीय रिझर्व्ह बँकेने दणका दिला. आरबीआयने या बँकेवर निर्बंध लादले. नाबार्डच्या तपासणीत गंभीर त्रुटी आढळल्या होत्या. त्यानंतर केंद्रीय बँकेने नाशिकमधील बँकेवर कारवाई केली. या कारवाईमुळे आता लाभांश वाटप, देणग्या आणि मोठ्या खर्चांवर बंधने येणार आहेत. तर आता शेतकऱ्यांना कर्जमाफीसाठी सरकारकडून जी रक्कम मिळणार आहे, त्याविषयी चर्चा सुरू झाली आहे. कर्जमाफीचा जिल्हा बँकेला ५०० कोटींचा बुस्टर डोस मिळणार आहे. या कारवाईने त्यावर काही परिणाम होणार का, याची सर्वसामान्यांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.

दरम्यान नाबार्डच्या तपासणीत बँकेच्या कारभारात गंभीर त्रुटी आढळल्या. त्याचा अहवाल सोपवण्यात आला. त्यानंतर जिल्हा बँकेवर ही धडक कारवाई करण्यात आली. जिल्हा बँकेला १५ लाखांवरील मोठ्या ठेवींच्या वापरावरही निर्बंध घालण्यात आले आहे. सहा महिन्यांत पुनरुज्जीवन आराखडा सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तोट्यातील शाखांचे विलीनीकरण किंवा बंद करण्याचे निर्देश देण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

# संगमनेरमध्ये वाढत्या...

पान १ वरून -

गतीरोधकाची स्थितीही तितकीच चिंताजनक आहे. अनेक ठिकाणी स्पीड ब्रेकर तुटलेले आहेत, तर काही ठिकाणी ते इतके झिजले आहेत की वाहनचालकांना त्यांचे अस्तित्वच जाणवत नाही. उलट काही ठिकाणी नियमबाह्य आणि अवैज्ञानिक पद्धतीने तयार केलेले स्पीड ब्रेकर आहेत. अशा स्पीड ब्रेकरवरून भरधाव वाहन गेल्यास चालकाचे नियंत्रण सुटण्याचा धोका निर्माण होतो. विशेषतः दुचाकीस्वारांसाठी ही परिस्थिती अधिक धोकादायक आहे. नवीन तंत्रज्ञान म्हणून वापरले प्लॅस्टिकचे गतीरोधक तर काही दिवसांतच तुटून पडतात. त्यातून खिळे देखील बाहेर येतात त्यामुळे दुचाकी अपघातग्रस्त होण्याची शक्यता वाढते.

वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असलेले परावर्तित फलक, दिशा दर्शक सूचना, झेब्रा क्रॉसिंगची रंगरंगोटी आणि रस्ते चिन्हे अनेक भागांमध्ये दिसून येत नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात वाहनचालकांना रस्त्यांचा योग्य अंदाज येत नाही. अपघातांचे प्रमाण वाढण्यामागे हीदेखील एक महत्त्वाची बाब आहे.

प्रशासनाकडून वेळोवेळी रस्ते सुरक्षा अभियान राबविले जातात, वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले जाते. मात्र नागरिकांकडून एक प्रश्न सातत्याने उपस्थित केला जातो की, जेव्हा मूलभूत सुविधा आणि सुरक्षित पायाभूत व्यवस्था उपलब्ध नाही, तेव्हा केवळ नागरिकांवरच जबाबदारी टाकून चालणार का? प्रशासनाने प्रथम रस्ते, सिग्नल आणि वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे आवश्यक आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक बांधकाम विभाग, वीज वितरण कंपनी आणि वाहतूक विभाग यांच्यात योग्य समन्वय नसल्याचे चित्र अनेकदा दिसून येते. एखादा डिव्हायडर तुटला किंवा सिग्नल बंद पडला तर त्याची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न अनेक दिवस अनुत्तरित राहतो. परिणामी दुरुस्तीचे काम लांबणीवर पडते आणि नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. या समस्येवर उपाय करायचा असेल तर काही तातडीच्या उपाययोजना आवश्यक आहेत. सर्व सिग्नलना बॅटरी बॅकअप किंवा सौरऊर्जेची सुविधा देणे गरजेचे आहे. तुटलेले डिव्हायडर आणि स्पीड ब्रेकर तातडीने दुरुस्त करावेत. रस्ते सुरक्षा लेखापरीक्षण करून धोकादायक ठिकाणांची ओळख पटवावी. परावर्तित रंग, चेतावणी फलक आणि झेब्रा क्रॉसिंगचे नूतनीकरण करावे. तसेच नागरिकांच्या तक्रारींची तत्काळ दखल घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करावी.

संगमनेर हे प्रगत शहर म्हणून विकसित होत असताना वाहतूक सुरक्षेकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. अपघात झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा अपघात होऊ नयेत यासाठी पूर्वतयारी करणे अधिक महत्त्वाचे आहे. नागरिकांच्या जीविताचे रक्षण ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे बंद पडणारे सिग्नल, तुटलेले डिव्हायडर आणि खराब स्पीड ब्रेकर यांसारख्या समस्यांकडे तत्काळ लक्ष देऊन प्रभावी कार्यवाही करणे ही काळाची गरज बनली आहे. अन्यथा एखाद्या मोठ्या दुर्घटनेनंतर केवळ चौकशा आणि आश्वासनांवरच समाधान मानावे लागेल, आणि त्याची किंमत निरपराध नागरिकांना आपल्या जीवाने मोजावी लागेल.

# नंदकुमार गोडसे यांचे निधन




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील प्रसिद्ध डिसेंट मिसळचे संचालक नंदकुमार दत्तात्रय गोडगे (वय ५१) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार (दि.५) रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. डिसेंट मिसळच्या माध्यमातून त्यांनी मोठे नाव कमवले होते. मोठा मित्रपरिवार देखील जोडला होता. त्यांच्यावर सायंकाळी शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा असा परिवार आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# दिल्लीत...

पान १ वरून - काही दिवसांपूर्वी देशाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी काही बेरोजगार तरुणांची तुलना 'कॉक्रोच' म्हणजेच झुरळांशी केली होती. याच विधानाचा आधार घेत सोशल मीडियावर उपरोधात्मक किंवा गमतीने 'कॉक्रोच जनता पार्टी' नावाचे हँडल तयार करण्यात आले होते. मात्र, अवघ्या चार दिवसांतच या हँडलचे फॉलोअर्स भाजप आणि काँग्रेस या दोन्ही राष्ट्रीय पक्षांपेक्षाही अधिक झाल्याने या डिजिटल चळवळीने आता प्रत्यक्ष राजकीय आंदोलनाचे रूप घेतले आहे.

# 'पुस्तकांचे गाव' उपक्रमाचे प्रभावी नियोजन करा - जिल्हाधिकारी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि ग्रामीण भागात ज्ञानाचा प्रसार व्यापक करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'पुस्तकांचे गाव' या महत्त्वाकांक्षी योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून उपक्रमाचे सुसूत्र नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात 'पुस्तकांचे गाव-विस्तार' योजनेअंतर्गत जिल्ह्यात 'पुस्तकांचे गाव' उभारण्याबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, तहसीलदार नागेश गायकवाड, जिल्हा ग्रंथालय निरीक्षक रामदास शिंदे, मराठी भाषा समिती सदस्य किशोर मरकड, संजय कळमकर, शशिकांत नजन तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, वाचन संस्कृती ही समाजाच्या बौद्धिक विकासाचा पाया आहे. ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी आणि युवकांना दर्जेदार साहित्य सहज उपलब्ध व्हावे, यासाठी 'पुस्तकांचे गाव' ही संकल्पना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ज्ञान, साहित्य आणि संस्कृतीचा प्रसार अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होईल.

पुस्तकांचे गाव उभारताना स्थानिक वैशिष्ट्ये, उपलब्ध जागा, वाचन संस्कृतीची परंपरा तसेच पर्यटनविकासाची क्षमता यांचा विचार करावा. हा उपक्रम केवळ पुस्तक विक्री किंवा प्रदर्शनापुरता मर्यादित न ठेवता वाचन प्रेरणा उपक्रम, साहित्यिक कार्यक्रम, ग्रंथदालन, अभ्यासिका आणि सांस्कृतिक उपक्रमांचा समावेश असलेले ज्ञानकेंद्र विकसित करण्यावर भर द्यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीत 'पुस्तकांचे गाव-विस्तार' योजनेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील संभाव्य ठिकाणे, उपलब्ध सुविधा, आवश्यक पायाभूत व्यवस्था तसेच उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी करण्यात येणाऱ्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# सुजय–संग्राम : अहिल्यानगरच्या राजकारणातील नवे शक्तिकेंद्र ?

## महायुतीची ताकद, विखे परिवाराचा प्रभाव आणि बदलती राजकीय समीकरणे








अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात अनेक वर्षांपासून विविध नेत्यांनी आपापले प्रभावक्षेत्र निर्माण केले आहे. सहकार चळवळ, साखर कारखाने, शिक्षण संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा-लोकसभा निवडणुका या सर्वांच्या माध्यमातून जिल्ह्याचे राजकारण आकार घेत आले. मात्र गेल्या काही वर्षांत जिल्ह्याच्या राजकीय पटावर एक वेगळे चित्र अधिक स्पष्टपणे दिसू लागले आहे. ते म्हणजे भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीचे वाढते वर्चस्व, विखे परिवाराचा कायम असलेला प्रभाव आणि विविध राजकीय प्रवाहांतील नेत्यांमध्ये निर्माण झालेला व्यावहारिक समन्वय.

अहिल्यानगर विधानपरिषद निवडणुकीत प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड ही केवळ एका जागेची निवड नव्हती. या घटनेने जिल्ह्यातील राजकीय वातावरण, सत्तेची ताकद, संघटनशक्ती आणि नेतृत्वाचे प्रभावी व्यवस्थापन पुन्हा एकदा अधोरेखित केले. विशेष म्हणजे या संपूर्ण प्रक्रियेत दोन नावे सतत चर्चेत राहिली-डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप. आज जिल्ह्यात राजकीय चर्चांमध्ये अनेकदा असा प्रश्न विचारला जात आहे की, भविष्यातील अहिल्यानगरच्या राजकारणाचे सूत्रधार कोण असतील? या प्रश्नाचे उत्तर शोधताना अनेकांच्या चर्चेत सुजय विखे आणि संग्राम जगताप ही जोडी केंद्रस्थानी दिसू लागली आहे.

### बिनविरोध निवडणूक म्हणजे केवळ योगायोग नव्हे

लोकशाही व्यवस्थेत निवडणूक बिनविरोध होणे ही दुर्मिळ घटना मानली जाते. विशेषतः राजकीयदृष्ट्या संवेदनशील आणि प्रतिष्ठेच्या निवडणुकीत विरोधक उमेदवार न उभा करणे किंवा शेवटच्या टप्प्यात माघार घेणे यामागे मोठे राजकीय गणित असते. विधानपरिषद निवडणुकीतही असेच चित्र पाहायला मिळाले. प्राजक्त तनपुरे यांच्या उमेदवारीनंतर सुरुवातीला विरोधी आघाडी निवडणूक लढवेल, अशी शक्यता वर्तवली जात होती. विविध स्तरांवर चर्चा, संभाव्य उमेदवारांची नावे आणि राजकीय हालचाली सुरू होत्या. मात्र प्रत्यक्षात अंतिम टप्प्यात विरोधकांकडून प्रभावी लढत उभी राहिली नाही. यामुळे महायुतीच्या राजकीय व्यवस्थापनाची चर्चा सुरू झाली. राजकारणात विजय फक्त मतदानाच्या दिवशी मिळत नाही. तो त्यापूर्वीच्या संवादातून, विश्वासातून आणि राजकीय रणनीतीतून घडवला जातो. विधानपरिषद निवडणुकीने याच गोष्टीची प्रचिती दिली.

### विखे परिवाराचा वारसा आणि आजचे वास्तव

अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणाचा इतिहास लिहिताना विखे परिवाराचा उल्लेख टाळता येत नाही. सहकार क्षेत्रातील क्रांतिकारी नेतृत्वापासून ते राज्य आणि राष्ट्रीय राजकारणापर्यंत या परिवाराने आपला ठसा उमटवला आहे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी ग्रामीण भागातील आर्थिक परिवर्तनाची पायाभरणी केली. त्यानंतर बाळासाहेब विखे पाटील यांनी दिल्लीपर्यंत प्रभाव निर्माण केला. पुढे राधाकृष्ण विखे पाटील यांनी राज्यातील प्रमुख नेतृत्व म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. आज त्या परंपरेचा पुढचा टप्पा म्हणून डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे पाहिले जाते. लोकसभा निवडणुकीनंतरही त्यांनी संघटनात्मक कामावर भर दिला. कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क, विविध मतदारसंघांतील बैठका आणि पक्षवाढीसाठी केलेले प्रयत्न यामुळे त्यांची प्रतिमा केवळ निवडणूक लढवणाऱ्या नेत्याची न राहता संघटन उभारणाऱ्या नेतृत्वाची बनत आहे.

### सुजय विखे यांचे वाढते राजकीय वजन

अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकीय चर्चांमध्ये आज डॉ. सुजय विखे पाटील यांचे नाव वेगळ्या संदर्भात घेतले जाते. ते केवळ विखे परिवाराचे वारसदार म्हणून नव्हे तर स्वतंत्र राजकीय नेतृत्व म्हणून पुढे येत आहेत. गेल्या काही वर्षांत त्यांनी विविध पक्षांतील नेत्यांशी संवाद राखला. मतभेद असले तरी संवादाची दारे उघडी ठेवण्याची त्यांची शैली राजकीयदृष्ट्या फायदेशीर ठरत असल्याचे निरीक्षक मानतात. विधानपरिषद निवडणुकीतही त्याच शैलीची झलक पाहायला मिळाली. निवडणूक बिनविरोध करण्यामागे अनेक स्तरांवरील चर्चांचा सहभाग असल्याचे बोलले जाते. त्यामुळे जिल्ह्यात त्यांचे राजकीय वजन वाढल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये दिसून येते.

### संग्राम जगताप : नगर शहरातील प्रभावी चेहरा

अहिल्यानगर शहराच्या राजकारणाचा विचार केला तर आमदार संग्राम जगताप हे स्वतंत्र शक्तिकेंद्र म्हणून ओळखले जातात. नगर शहरातील विविध सामाजिक, राजकीय आणि स्थानिक प्रश्नांमध्ये त्यांचा प्रभाव कायम राहिला आहे. नगर शहरातील मतदारसंघावर पकड, स्थानिक पातळीवरील संपर्क आणि संघटन उभारणी यामुळे त्यांनी स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. अनेकदा ते आक्रमक भूमिकेसाठी ओळखले जात असले तरी संवादातून प्रश्न सोडविण्याची त्यांची क्षमता देखील अधोरेखित केली जाते. विधानपरिषद निवडणुकीच्या काळात घडलेल्या काही घटनांमुळे त्यांची ही प्रतिमा अधिक बळकट झाली.

### 'जय-वीरू'ची चर्चा का?

राजकीय वर्तुळात एखाद्या दोन नेत्यांबद्दल तुलना सहज होत नाही. मात्र या निवडणुकीनंतर सुजय विखे आणि संग्राम जगताप यांच्या समन्वयाची चर्चा सर्वत्र झाली. यामागे कारणही तसेच आहे. दोघे वेगवेगळ्या राजकीय पार्श्वभूमीतून आले असले तरी काही महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांनी संवाद आणि समन्वय साधल्याचे चित्र निर्माण झाले. अंतिम टप्प्यातील राजकीय गुंतागुंत सोडविण्यात दोघांची भूमिका महत्त्वाची ठरल्याचे अनेकांचे मत आहे. याच कारणामुळे कार्यकर्ते आणि राजकीय निरीक्षकांमध्ये या जोडीची तुलना 'जय-वीरू'शी केली जाऊ लागली.

### प्राजक्त तनपुरे यांचा प्रवास

प्राजक्त तनपुरे यांचा राजकीय प्रवासही तितकाच महत्त्वाचा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधून पुढे आलेले हे नेतृत्व राहुरी परिसरात प्रभावी मानले जाते. पक्षांतरानंतर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि अल्पावधीतच विधानपरिषद उमेदवारी मिळवली. ही बाब स्वतःमध्येच एक राजकीय संदेश मानली जाते. भाजपने केवळ एका नेत्याला पक्षात घेतले नाही, तर त्यांना महत्त्वाच्या भूमिकेत आणून व्यापक राजकीय संकेत दिले. त्यांची बिनविरोध निवड म्हणजे भाजपच्या विस्तार धोरणाचे उदाहरण असल्याचे अनेक राजकीय विश्लेषक मानतात.

### महायुतीची संघटनशक्ती

राजकारणात सत्ता टिकवण्यासाठी संघटन महत्त्वाचे असते. बूथ पातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत मजबूत जाळे असलेल्या पक्षालाच दीर्घकालीन यश मिळते. अहिल्यानगरमध्ये भाजपने गेल्या दशकात संघटनशक्तीवर मोठी गुंतवणूक केली. ग्रामीण भागातील कार्यकर्ते, स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रतिनिधी, सामाजिक संघटनांशी संपर्क आणि प्रभावी नेतृत्व यांच्या जोरावर पक्षाने आपला विस्तार केला. विधानपरिषद निवडणुकीच्या निमित्ताने ही संघटनशक्ती पुन्हा एकदा दिसून आली.

### विरोधकांसमोरील आव्हान

या निवडणुकीत विरोधी पक्षांपुढील मोठे आव्हान म्हणजे एकसंध भूमिका घेण्यात आलेले अपयश होते. अनेक संभाव्य पर्याय चर्चेत आले, मात्र अंतिम टप्प्यात त्यांचे रूपांतर प्रभावी लढतीत झाले नाही. यामुळे विरोधी पक्षांच्या संघटनात्मक क्षमतेबाबत प्रश्न उपस्थित झाले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये हा मुद्दा पुन्हा चर्चेत राहण्याची शक्यता आहे.

### आगामी निवडणुकांचे संकेत

विधानपरिषद निवडणुकीचा निकाल हा भविष्यातील राजकीय चित्राचा संकेत मानला जातो. आगामी महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निकाल महत्त्वाचा आहे. महायुतीला यामुळे आत्मविश्वास मिळाला आहे. तर विरोधकांसाठी ही संघटनात्मक पुनर्बांधणीची संधी आहे. अहिल्यानगर विधानपरिषद निवडणूक ही केवळ एका उमेदवाराच्या बिनविरोध निवडीची घटना नव्हती. ती जिल्ह्यातील बदलत्या राजकीय समीकरणांची, महायुतीच्या वाढत्या प्रभावाची, विखे परिवाराच्या कायम असलेल्या दबदब्याची आणि सुजय विखे-संग्राम जगताप या समन्वयक जोडीच्या उदयाची कथा होती. आज जिल्ह्यात एक नवीन राजकीय वास्तव आकार घेताना दिसत आहे. त्या वास्तवाच्या केंद्रस्थानी महायुती, विखे परिवार आणि स्थानिक पातळीवरील प्रभावी नेतृत्व आहे. आगामी निवडणुकांमध्ये हे वास्तव कितपत दृढ होते, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. मात्र एक गोष्ट निश्चित आहे-अहिल्यानगरच्या राजकारणात सुजय विखे आणि संग्राम जगताप या नावांची चर्चा आता आणखी काही काळ तरी केंद्रस्थानी राहणार आहे.






# "आम्ही मराठी उद्योजक चळवळ" मराठी उद्योजकांसाठी व्यासपीठ म्हणून काम करणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

पुणे - महाराष्ट्राची राजभाषा मराठी,महाराष्ट्रात मूळ वास्तव्यास राहणारा माणूस मराठी मात्र, उद्योग व्यवसायात मराठी माणूस कमी पडत आहे. बाहेरील राज्यातील अमराठी उद्योजक महाराष्ट्रात येऊन उद्योग व्यवसाय करत आहे. त्यांच्या हाताखाली मराठी माणूस काम करत आहे. मराठी माणूस नेमका कमी कुठे पडतो आहे.मराठी माणसांना उद्योग व्यवसायाचे कौशल्य वापरण्याचे आणि बुद्धीने उद्योग व्यवसाय करण्यासाठी आम्ही मराठी उद्योजक चळवळ व्यासपीठ निर्माण करण्यात आले आहे.

रविवार दिनांक ३१ मे २०२६ रोजी आम्ही मराठी उद्योजक चळवळीची बैठक चिखली पुणे येथे संपन्न झाली. या बैठकीस व्यावसायिक प्रशिक्षण प्रबोधिनीचे संस्थापक प्रशांत कहाणे, ब्रेन वे रिसर्च फाउंडेशनचे संस्थापक अशोक सोनवणे, मन प्रबोधिनीचे संस्थापक प्रवीण पारगावकर, सोशल ट्रस्टचे अध्यक्ष सुनील बेनके, युवा ध्येय वृत्तपत्राचे संपादक लहानु सदगीर हे उपस्थित होते.



महाराष्ट्रातील मराठी नवीन उद्योजकांना व्यासपीठ निर्माण करून देणे,त्यांना व्यावसायिक कौशल्य आत्मसात करण्यासाठी प्रशिक्षण देणे,मानसिक तयारी करून घेणे,विविध क्षेत्रातील उद्योग व्यवसायाच्या संधी माहिती करून देणे.

११ व १२ जुलै २०२६ रोजी लोणावळा येथे मराठी उद्योजकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.या कार्यशाळेमध्ये प्रत्येक जिल्ह्यातील मराठी उद्योजकांना जबाबदारी दिली जाणार आहे.तरी, जास्तीत जास्त मराठी उद्योजकांना लोणावळा येथील कार्यशाळेसाठी आमंत्रित करण्यात येत आहे.

अधिक माहितीसाठी पुढील क्रमांकावर मो. ९११५७ ७७१७१, ७७६८०७९२७२, ९४२२० ०२३००,९३७०२ ७४६७५, ९६०४५ ५२६९८, ९३७०१७४६७५ संपर्क साधावा.

# संपादकीय...

## कधी बदलणार समाजाची मानसिकता?

अहिल्या नगर जिल्ह्यातील विविध गावांमध्ये जाऊन महिलांचे बेकायदेशीर गर्भलिंग निदान करणाऱ्या रॅकेटचा श्रीरामपूर अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या पोलिस पथकाने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी मुख्य आरोपींसह अनेक डॉक्टर आरोपींना पोलिसांनी अटक केली असून या गर्भलिंग निदान रॅकेटची कसून चौकशी पोलिस करत आहेत.

एक डॉक्टर बेकायदेशीर गर्भलिंग निदान करत असल्याचा व्हिडिओ देखील समाज माध्यमात व्हायरल झाला असून या रॅकेटची व्याप्ती खूप मोठी असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले असून या बेकायदेशीर गर्भलिंग निदान करणाऱ्या टोळीने ५०० हून अधिक स्त्रीभ्रूण हत्या केल्या असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या बेकायदेशीर गर्भलिंग निदान रॅकेटचा भांडाफोड झाल्याने सर्वत्र खळबळ माजली असून स्त्री भ्रूण हत्येचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. बेकायदेशीर गर्भलिंग निदान करून स्त्री भ्रूण हत्या करणे कायद्याने गुन्हा असतानाही असे प्रकार सातत्याने घडताना दिसतात. अर्थात याला समाजाची मानसिकता कारणीभूत आहे आज २१ व्या शतकातही आपल्या समाजाची मानसिकता १८ व्या शतकातील आहे हेच यावरून सिद्ध झाले आहे. स्त्री भ्रूण हत्येच्या घटनांवरून सिद्ध होते की आजही आपण मुलींकडे सकारात्मक दृष्टीने पाहत नाही. केवळ ग्रामीण भागातच नाही तर शहरी भागातही मुलींकडे नकारात्मक दृष्टीनेच पाहिले जाते. मुलगी म्हणजे परक्याचे धन ही अठराव्या शतकातील मानसिकता आजही कायम आहे. मुलगी ही परक्याचे धन असल्याने तिला जन्म घेण्याचा अधिकारच नाही अशी पुरुषी मानसिकता आजही समाजातील काही लोकांत आहे जरी मुलगी जन्माला आली तरी तिला प्रत्येक पातळीवर मानहानी स्वीकारावी लागते. मुलांना हारतुरे देऊन त्यांचा लाड करणारा आपला समाज मुलींचा गळा घोटायला देखील मागेपुढे पाहत नाही. मुलांना वंशाचा दिवा म्हणतात पण मुलगी देखील वंशाची पणती आहे हे विसरून तिला विजवले जाते. एकाच समाजाचे हे दोन भिन्न टोक विदारक चित्र दर्शवते. मुलींबद्दल आपल्या समाजात कमालीची असहिष्णुता दिसते. कधी मुलींना गर्भातच मारून टाकले जाते तर कधी जन्मल्यानंतर कचऱ्याच्या कुंडीत फेकून दिले जाते. एकीकडे दुर्गा, लक्ष्मी या देवींची पूजा करायची तर दुसरीकडे त्यांचेच दुसरे रूप असलेल्या मुलींचा मात्र दुस्वास करायचा. ज्या देशात राष्ट्रपती, पंतप्रधान असे देशाचे सर्वोच्चपद महिलेने सांभाळले आहे त्याच देशात मुलींना जन्म घेण्याचा देखील अधिकार नाही याला काय म्हणावे ? आजही भारतीय समजात मुलगा, मुलगी असा भेद केला जातो म्हणूनच लिंग परीक्षण, स्त्रीभ्रूण हत्या या सारखे प्रकार या देशात घडतात. आपल्या देशात लिंग परीक्षण, भ्रूण हत्येला बंदी असतानाही कधी कायद्याच्या पळवाटा शोधून तर कधी कायद्याचे रक्षक असलेल्या शासन आणि प्रशासनाचे हात ओले करून लिंग परीक्षण व स्त्री भ्रूण हत्या केली जाते म्हणूनच आपल्या देशात मुलांच्या मानाने मुलींचा जन्मदर कमी होत चालला आहे. काही वर्षापूर्वी युनायटेड स्टेट ऑफ पॉप्युलेशन फंड ( यूएनपीएफ) या लोकसंख्या विषयी अभ्यास करणाऱ्या जागतिक संस्थेने एक अहवाल प्रसिद्ध केला होता. या अहवालानुसार हा अहवाल प्रसिद्ध होण्यापूर्वीच्या चार वर्षात भारतातल्या ४ लाख ६० हजार मुलींचा जन्माआधीच गळा घोटण्यात आला होता. त्यात गर्भलिंग परीक्षणात दोन तृतीयांश तर प्रसूती पश्चात मुलगी झाल्याचे कळल्याने एक तृतीयांश मुली नाहीशा झाल्या होत्या. भारतासारख्या पुरोगामी देशाला खाली मान घालायला लावणारा हा अहवाल होता. २१ व्या शतकातही आपल्या समाजाची मानसिकता १८ व्या शतकातीलच आहे हे दाखवणारा हा अहवाल होता. हा अहवाल सरकारच्या देखील डोळ्यात अंजन घालणारा होता. या अहवालानंतर सरकार गर्भलिंग निदान आणि स्त्री भ्रूणहत्ये विरोधात कठोर भूमिका घेईल आणि दोषींना कठोरातील कठोर कारवाई करेल जेणे करून या घटनांना आळा बसेल अशी अपेक्षा होती पण ती अपेक्षा फोल ठरली असेच पुण्यातील या घटनेने म्हणावे लागेल. केवळ बेटी बचाओ, बेटी पढाओ अशी नारेबाजी करून मुली वाचणार नाहीत तर त्यासाठी सरकारने ठोस धोरण आखायला हवे. लिंग परीक्षण, स्त्री भ्रूण हत्ये विरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी करायला हवी. दोषींना कठोर शिक्षा करायला हवी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाजाची मानसिकता बदलायला हवी त्यासाठी समाजाचे सातत्याने प्रबोधन व समुपदेशन करायला हवे.

# शिवराज्याभिषेक सोहळा

## हिंदवी स्वराज्याच्या गौरवशाली युगाचा सुवर्णक्षण

शिवराज्याभिषेक सोहळा हा मराठा स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आयुष्यातील एक ऐतिहासिक आणि स्वाभिमान जागवणारा प्रसंग आहे. हा सोहळा ६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर संपन्न झाला, ज्यामुळे शिवाजी महाराजांना अधिकृतपणे छत्रपती ही पदवी मिळाली आणि मराठा स्वराज्याला विधिवत मान्यता प्राप्त झाली. हा सोहळा केवळ महाराष्ट्राच्या नव्हे, तर संपूर्ण भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

**शिवराज्याभिषेकाची पार्श्वभूमी -**

छत्रपती शिवाजी महाराजांनी विजापूरच्या आदिलशाही, मोगल साम्राज्य आणि इतर परकीय सत्तांविरुद्ध लढा देऊन स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी मराठ्यांच्या स्वातंत्र्याचा आणि स्वाभिमानाचा पाया घातला. स्वराज्य स्थापन केल्यानंतर, त्याला अधिकृत आणि विधिवत मान्यता मिळावी, तसेच शिवाजी महाराजांना स्वतंत्र हिंदू राजा म्हणून घोषित करावे, यासाठी राज्याभिषेकाचा सोहळा आयोजित करण्यात आला. हा सोहळा मुघल आणि इतर सत्तांना स्वराज्याच्या सामर्थ्याचा संदेश देणारा ठरला. अनेक पिढ्यांपासून हिंदू राजांचा विधिवत राज्याभिषेक होत नव्हता. शिवाजी महाराजांनी हा विधी करून हिंदू परंपरेचे पुनरुज्जन केले आणि रयतेचा स्वाभिमान जागवला.

शिवराज्याभिषेकाची तारीख आणि ठिकाण पहिला शिवराज्याभिषेक सोहळा ६ जून १६७४ रोजी (ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, शालिवाहन शके १५९६) रायगड किल्ल्यावर पार पडला. रायगड हा किल्ला शिवाजी महाराजांनी मे १६५६ मध्ये स्वराज्यात सामील केला होता आणि स्वराज्याची राजधानी म्हणून त्याची निवड केली होती. हा मजबूत किल्ला सोहळ्यासाठी योग्य ठिकाण होता. काही तांत्रिक आणि धार्मिक कारणांमुळे (तंत्रमार्गी ब्राह्मणांचा आग्रह), शिवाजी महाराजांनी दुसरा राज्याभिषेक २४ सप्टेंबर १६७४ रोजी (अश्विन शुद्ध पंचमी) पुराणोक्त पद्धतीने केला.

**सोहळ्याची तयारी -**

देशभरातून सुमारे ११,००० ब्राह्मण आणि जवळपास एक लाख लोक रायगडावर जमले होते. यासाठी चार महिने आधीपासून तयारी सुरू होती, ज्यात पाहुण्यांची राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था करण्यात आली. सोहळ्यासाठी ३२ मण सोन्याचे भव्य सिंहासन बनवण्यात आले होते, ज्यावर शिवाजी महाराज विराजमान झाले.

२१ मेपासून शिवाजी महाराज धार्मिक विधींमध्ये सहभागी झाले. त्यांनी विविध मंदिरांना भेटी देऊन भवानी मातेला सव्वा मण सोन्याची छत्री अर्पण केली. २८ मे रोजी प्रायश्चित्त आणि ३० मे १६७४ रोजी शिवाजी महाराजांनी शास्त्रानुसार राण्यांशी समंत्रक विवाह केले, कारण त्यांचे मौजीबंधन झाले होते. यामुळे त्यांना आणि पट्टराणी सोयराबाई यांना राज्याभिषेकासाठी शास्त्रोक्त हक्क मिळाले.

**सोहळ्याचा घटनाक्रम-**

काशी येथील प्रख्यात विद्वान पंडित गागाभट्ट यांनी राज्याभिषेकाचे विधी पार पाडले. त्यांनी शिवाजी महाराजांना शिवछत्रपती म्हणून घोषित केले आणि त्यांच्या डोक्यावर मोत्याची झालर ठेवली. सोहळा पहाटे मंत्रोच्चार आणि धार्मिक संस्कारांनी सुरू झाला. सोळा सवाष्णींनी शिवाजी महाराजांना ओवाळले, आणि ब्राह्मणांनी मंत्रोच्चार केले. शिवराज की जय च्या घोषणांनी आसमंत दुमदुमला. सोन्या-चांदीची फुले उधळली गेली, आणि तोफांच्या सलामी देण्यात आल्या.



सोहळ्यास महाराणी सोयराबाई आणि युवराज संभाजी यांचाही अभिषेक झाला.इंग्रज अधिकारी हेन्री ऑक्सिडेन यांनी या सोहळ्याला उपस्थिती लावली आणि त्यांनी त्याच्या डायरीत या भव्य सोहळ्याचे सविस्तर वर्णन केले, जे इतिहासाचा महत्त्वाचा पुरावा मानला जातो. सोहळ्यासाठी रायगडावर डौलदार हत्ती वापरण्यात आले. हेन्री ऑक्सिडेन हत्ती पाहून आश्चर्यचकित झाला होता. शिवाजी महाराजांनी लहान वयाचे हत्ती रायगडावर आणून ठेवले होते, ज्यामुळे रायगडाच्या अवघड वाटांवर त्यांना सहज आणता आले.

**सोहळ्याचे वैशिष्ट्ये -**

राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराजांनी शिवशक ही नवीन कालगणना सुरू केली, जी आजही अस्तित्वात आहे. यामागे त्यांचा दूरदृष्टीचा दृष्टिकोन दिसतो. शिवाजी महाराजांनी शिवराई (चांदीची नाणी) आणि होन (सोन्याची नाणी) ही स्वतंत्र चलने चलनात आणली, ज्यामुळे स्वराज्याची आर्थिक स्वायत्तता दिसून येते. स्वराज्याच्या केंद्रीय प्रशासनाचे महत्त्वाचे अंग असलेले अष्टप्रधान मंडळ याच वेळी अधिकृतपणे स्थापन झाले. हा सोहळा हिंदू परंपरेच्या पुनरुज्जनाचा आणि स्वराज्याच्या स्वातंत्र्याचा प्रतीकात्मक संदेश होता. यामुळे मराठ्यांमध्ये स्वाभिमानाची भावना निर्माण झाली.

**शिवराज्याभिषेकाचे महत्त्व -**

या सोहळ्यामुळे मराठा स्वराज्याला अधिकृतपणे स्वतंत्र राज्याची मान्यता मिळाली. मोगल, आदिलशाही आणि इतर परकीय सत्तांच्या काळात हिंदू राजाची स्थापना करून शिवाजी महाराजांनी रयतेचा स्वाभिमान जागवला. रायगडाला स्वराज्याची राजधानी म्हणून केंद्रस्थानी आणले गेले. आजही हा सोहळा महाराष्ट्रात सणासारखा साजरा केला जातो. रायगडावर दरवर्षी हजारो शिवभक्त जमून हा ऐतिहासिक क्षण साजरा करतात.

## अपार्टमेंटच्या पार्किंगमधून दुचाकीची चोरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : शहरातील जनतानगर गल्ली क्रमांक १ मधील तुषार प्राईट अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये लावलेली सुमारे ३० हजार रुपये किंमतीची बजाज कंपनीची पल्सर दुचाकी (क्रमांक एमएच. १४ एचझेड. २५६८) दि. १ जून २०२६ रोजी रात्री अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना घडली. याबाबत स्वप्निल भगवान भांबरे (वय ३२, रा. संगमनेर खुर्द) यांनी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुढील तपास पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला हेड कॉस्टेबल गोणके करीत आहेत.


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
MOHAMMED
FAIZ ILYAS SHAIKH

NEW NAME AS
MOHAMMED
FAIZ ILIYAS QURESHI

ADD – JSHIF HOSPITAL MAGE, MOGALPURA ,SANGAMNER TAL - SANGAMNER, DIST- AHMEDNAGAR

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090


### जाहीर नोटीस

काकडवाडी ता. संगमनेर जिल्हा अहिल्यानगर येथील गट नं. २४६ खाता क्रमांक ५३३ मधील पंढरीनाथ केरू चत्तर यांच्या मालकीची काकडवाडी ता. संगमनेर येथे क्षेत्र ०.६४, आकार ०.८५ असे आहे. खरेदी खतानूसार इतर हक्कातील व्यक्तींनी सर्वानूमते संमती दिलेली आहे. व नजरचुकीने ती नावे वर्षानुवर्षे तशीच राहिली आहे. त्याचा संगमनेर तहसील येथे जाहीरनामा देखील प्रसिद्ध झालेला आहे.

दरम्यान याबाबत कुणास काही हरकत असेल तर त्यांनी १८/६/२०२६ पर्यंत तहसील कार्यालय संगमनेर येथे लेखी पुराव्यानिशी संपर्क साधावा.

**इतर हक्कातील नावे**
**१) जिनसाबाई रामा**
**२) सकुबाई नाना**
**३) ठकुबाई बाळा**

**समाधान पंढरीनाथ चत्तर**
**नान्नज दुमाला, ता. संगमनेर**


**छोट्या जाहिरातांठीसंपर्क करा**
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०


### जाहिर नोटीस

दिनांक. ०४/०६/२०२६

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन जि. अहिल्यानगर, ता. संगमनेर पैकी, मौजे संगमनेर बु।। येथील नगरपालिका हद्दीतील स.नं. ९६/४ क्षेत्र ३६५ चौ.मी. या प्लॉट मिळकतीमधील पडतानी कॉम्प्लेक्स या नावाने असलेल्या बांधीव इमारतीमधील दुस-या मजल्यावरील फ्लॅट नं. ४ बिल्टअप क्षेत्र ३५.३१ चौ.मी. ही मिळकत श्री. राजेंद्र श्रीपत कु-हाडे यांचे खरेदी मालकी हक्काची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची आहे. सदरील विद्यमान मालक यांनी माझ्या अशिलांना वर नमुद मिळकत कायमखुश खरेदी देण्याचे ठरवुन व्यवहार पक्का केला आहे व त्यांनी वर नमुद मिळकत ही निर्वेध, निर्जोखमी व बोजाविरहीत आहे अशी खात्री व भरवसा सदरचे विद्यमान मालक यांनी माझे अशिलांना दिला आहे. तरी उपरोक्त मिळकतीसंदर्भात कोणीही कुठल्याही प्रकारचा व्यवहार, बोजा, तारण, साठेखत, लिन, लिज, मृत्युपत्र, मुखत्यार पत्र, पोटगी चे हक्क तसेच कोणत्याही वित्त संस्थेचा कोणत्याही प्रकारे बोजा, मे. कोर्टात कारवाई अगर मनाई हुकूम असल्यास अगर सदर मिळकतीच्या मालकी संदर्भात कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत साक्षांकित कागदपत्रांसह वर नमुद पत्त्यावर जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाच्या आत सादर करावी. प्रस्तुत मुदतीत कोणीही कोणत्याही प्रकारचे हरकत न नोंदवल्यास सदर मिळकत निर्वेध, निर्जोखमी व बोजाविरहीत आहे असे समजुन सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व मग त्यानंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. परस्पर घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वर नमुद केलेल्या मिळकतींबाबत मे. दुय्यम निबंधक साहेब, संगमनेर यांचे कार्यालयात खरेदीखताचा दस्त नोंदविण्यात येईल याची जाहीर नोंद घेण्यात यावी.

**ॲडव्होकेट**
**ॲड. मधुकर पी. भांगरे**
संगमनेर जिल्हा व सत्र न्यायालय समोर,
जिजामाता प्राईड कॉम्पलेक्स, गाळा नं.१०४
घुलेवाडी फाटा, ता. संगमनेर, जि. अ.नगर
मो. ९८६०४८३९९५, ७५८८००४७७९

### तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ सेतु/ मृत्यू नोंद/५४१/२०२६
दिनांक - ०८/०५/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. किसन नंदू भालेराव, रा. मालदाड, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २४/०३/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. मालदाड, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची आई नामे सुंदरबाई नंदू भालेराव यांचा मृत्यू मौजे मालदाड ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक १६/०७/१९९७ १रोजी झाला असून त्यांचा/त्यांची मृत्यू नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, मालदाड यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, कुरकुंडी यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहिरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


**पाहिजेत**
संगमनेर मधील नामांकित कॅफेच्या मार्केटिंगसाठी अनुभवी प्रतिनिधी पाहिजे आहेत.
टू व्हिलर आवश्यक
9423793758

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर
श्री गणेश टायर्स
या फॉर्मसाठी
सेल्समन -3
सुपर कॅरी ड्रायव्हर - 1
कामाचा अनुभव आवश्यक
9423793758

**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458

**पाहिजेत**
मे. संदीप महाले ज्वेलर्ससाठी
दागिन्यांच्या बिलिंगसाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत
- संपर्क-
मे. संदीप बबन महाले ज्वेलर्स
बाजारपेठ, संगमनेर, जि. अ.नगर
8698305864

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846









**पाहिजेत**
होलसेल मेडीकल दुकान कामासाठी मुले पाहिजेत
इंग्रजीचे ज्ञान आवश्यक
आकर्षक पगार
संपर्क- ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
9730042410

**कामगार भरती**
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

**जागा भाड्याने देणे**
३ मजली
८०० स्क्वेफूट
ठिकाण -
मोमीनपुरा चौक,फेमस शुज समोर, संगमनेर
9028342110

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरूष)
ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला)
कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरूष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

# विधानपरिषद निवडणूक बिनविरोध

## जिल्ह्यात भाजपासह महायुतीची ताकद पुन्हा अधोरेखित

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - विधानपरिषद निवडणुक जागा बिनविरोध करून दाखवत भारतीय जनता पक्षा सह महायुतीने राजकीय पातळीवर महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. अपेक्षेप्रमाणे भाजपचे उमेदवार प्राजक्त तनपुरे हे बिनविरोध निवडून आले असून, या घडामोडीमुळे जिल्ह्यात भाजपची संघटनात्मक ताकद आणि राजकीय प्रभाव पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

### सुजय संग्राम जय वीरूच्या जोडीने केली कमाल



महाविकास आघाडीकडून ही जागा काँग्रेसच्या वाट्याला गेल्याचे सुरुवातीला सांगितले जात होते. मात्र काँग्रेसकडून कोणत्याही अधिकृत उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडून राणी लंके यांचे नाव चर्चेत आले होते. त्या अर्ज दाखल करतील, अशी चर्चा होती. मात्र अखेर महाविकास आघाडीकडून एकाही उमेदवाराने अर्ज भरला नाही.

अर्ज मागे घेण्याच्या अंतिम टप्प्यापर्यंत भाजपचे प्राजक्त तनपुरे, श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाणे, श्रीगोंद्याचे राष्ट्रवादीचे कार्यकर्ते दत्तात्रय पानसरे, तसेच कमलेश गांधी आणि मच्छिंद्र धुमाळ यांचे अर्ज शिल्लक होते. गुरुवारी दुपारपर्यंत मच्छिंद्र धुमाळ आणि कमलेश गांधी यांनी आपले अर्ज मागे घेतले.

दरम्यान, काही काळासाठी करण ससाणे हे संपर्काबाहेर गेल्याने राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र त्यांनीही अचानक समोर येत आपला अर्ज मागे घेतला. त्यानंतर प्राजक्त तनपुरे यांच्या विरोधातील एकमेव अर्जदार राहिलेले दत्तात्रय पानसरे यांची मनधरणी करण्यात महायुतीला यश आले. अर्ज मागे घेण्याच्या मुदतीच्या अखेरच्या काही मिनिटांत त्यांनीही माघार घेतल्याने प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली. विशेष म्हणजे, नुकतेच भाजपमध्ये प्रवेश केलेले प्राजक्त तनपुरे हे आता अहिल्यानगर जिल्ह्यातील १८ वे आमदार ठरले आहेत.

विशेष म्हणजे या संपूर्ण राजकीय घडामोडीत डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या समन्वयाचीही मोठी चर्चा रंगली. उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतिम टप्प्यात दत्तात्रेय पानसरे यांनी अर्ज बळजबरीने किंवा खोट्या सहीने मागे घेतल्याचा आरोप केल्याने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र त्यानंतर आमदार संग्राम जगताप आणि दत्तात्रेय पानसरे यांच्यात बंद दाराआड सविस्तर चर्चा झाली. चर्चेनंतर दोघेही एकाच वाहनातून बाहेर पडल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले. अखेर पानसरे यांची समजूत काढण्यात यश आले आणि त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातून बाहेर पडत माघारीची भूमिका कायम ठेवली. त्यामुळे प्राजक्त तनपुरे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. या संपूर्ण प्रक्रियेत डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी घेतलेल्या पुढाकारामुळेच शेवटच्या क्षणी निर्माण झालेला पेच सुटल्याची चर्चा सुरू असून, राजकीय वर्तुळात या जोडीची तुलना जय-वीरू जोडीशी केली जात आहे.

या बिनविरोध विजयामागे गेल्या चार दिवसांपासून डॉ. सुजय विखे पाटील यांनी घेतलेले प्रयत्न महत्त्वाचे ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचा उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यासाठी पक्षाने दिलेली जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे पार पाडल्याचे मानले जात आहे.यापूर्वी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही प्राजक्त तनपुरे यांना निवडणूक लढविण्यापासून परावृत्त करत अक्षय कर्डिले यांचा मार्ग मोकळा करण्यात डॉ. सुजय विखे पाटील यांची भूमिका महत्त्वाची ठरल्याची चर्चा झाली होती. त्यानंतर आता विधानपरिषद निवडणूक बिनविरोध घडवून आणण्यातही त्यांचे योगदान निर्णायक ठरल्याचे बोलले जात आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका आणि जिल्ह्याच्या राजकारणात भाजपची वाढती संघटनात्मक ताकद या निकालातून पुन्हा एकदा स्पष्ट झाली आहे. सर्वपक्षीय समन्वय, संवादकौशल्य आणि संघटन व्यवस्थापनाचेही दर्शन घडविल्याची प्रतिक्रिया राजकीय जाणकारांकडून व्यक्त होत आहे. या घडामोडींमुळे अहिल्यानगर जिल्ह्यात भाजपचे राजकीय वर्चस्व आणखी बळकट झाल्याची चर्चा सुरू असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या विजयाकडे महत्त्वपूर्ण राजकीय संदेश म्हणून पाहिले जात आहे.

# अग्रवाल चहा कंपनीच्या नवीन विस्तारित शाखेचा रविवारी भव्य शुभारंभ

युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव -कोपरगाव शहरातील ग्राहकांचा विश्वास संपादन केलेली अग्रवाल चहा कंपनी आता नवीन विस्तारित शाखेसह ग्राहकांच्या सेवेत दाखल होत आहे. या नवीन शाखेचा उद्घाटन सोहळा रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता उत्साहात संपन्न होणार आहे. या शुभारंभ सोहळ्यास राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराज आश्रम, कोपरगावचे मठाधिपती सद्गुरू महंत प.पू. रमेशगिरीजी महाराज यांचे शुभहस्त लाभणार असून विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमास नितीनदादा शंकररावजी कोल्हे, बिपीनदादा शंकररावजी कोल्हे, स्नेहलताताई बिपीनदादा कोल्हे, अमितदादा नितीनराव कोल्हे, परागजी संघान तसेच प्रसिद्ध उद्योजक कांतीलालजी ब्रिजलालजी अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

गेल्या चाळीस वर्षांहून अधिक काळ ग्राहकांच्या सेवेत असलेल्या अग्रवाल चहा कंपनीने दर्जेदार चहा, ड्रायफ्रूट्स आणि डेली फूड्सच्या विक्रीत वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्राहकांकडून मिळालेल्या प्रेम, विश्वास आणि सहकार्याच्या बळावर कंपनीने व्यवसायाचा विस्तार करत नवीन शाखा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

ग्राहकांनी आजवर दिलेले अमूल्य सहकार्य भविष्यातही असेच कायम राहावे, अशी अपेक्षा व्यक्त करत अग्रवाल परिवाराने नागरिकांना या शुभारंभ सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

अग्रवाल चहा कंपनीची नवीन विस्तारित शाखा छत्रपती संभाजी महाराज चौक, डॉ. कोटेरी हॉस्पिटलजवळ, कोपरगाव येथे सुरू होत असून या कार्यक्रमास व्यापारी, उद्योजक, ग्राहक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# खांबे गावात काँग्रेसला खिंडार

## शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील खांबे गावात काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसला असून विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे पदाधिकारी आणि शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांनी गुरुवारी (दि. ४) सायंकाळी आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. आमदार खताळ यांच्या कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्यात तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

आमदार अमोल खताळ कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की , गेल्या चाळीस वर्षांत अपेक्षित विकास झाला नाही. मात्र महायुती सरकारच्या माध्यमातून गेल्या दीड वर्षांत तालुक्यात विविध विकासकामांना गती देण्यात आली असून मतदारसंघाचा चेहरा-मोहरा बदलत आहे. खांबे गावाच्या विकासासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.कार्यक्रमास खांबे ग्रामपंचायतीचे सरपंच रविंद्र दातीर, सोसायटीचे अध्यक्ष लक्ष्मण जोशी, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रमेश काळे, विठ्ठल दातीर, बाबासाहेब दातीर, रामेश्वर शिंदे, दिगंबर दातीर, गबाजी कोरडे, भिकाजी वाघ, प्रेमराज बुधे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुंजा जोशी, सुखदेव भतांबरे, रावसाहेब भांड, बाबूराव कापडी, बारकू पेकारी, बाबा एकनाथ जोशी, नवनाथ दातीर, एकनाथ दातीर, सुभाष केदार, राजू शेंडगे, बाळासाहेब दातीर, खुशाल वाघ, जनार्दन जोरी, संजय दातीर, ठकाजी दातीर, नामदेव दातीर, ज्ञानेश्वर दातीर, रवी जोरी, सोमनाथ शेंडगे, माणिक जोरी, भाऊसाहेब शेंडगे, सखाराम दातीर, रविराज जोशी, पवन जोशी यांच्यासह शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

केंद्र व राज्यात महायुतीचे सरकार असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून तालुक्यातील विकासकामांना वेग मिळत आहे. खांबे गावातील हा पक्षप्रवेश सोहळा साकूर पठार भागात शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढविणारा ठरेल. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुकांत या भागात शिवसेनेचा भगवा निश्चित फडकेल, असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

खांबे ग्रामपंचायतीचे सरपंच रविंद्र दातीर म्हणाले, गेल्या ४० वर्षांत गावाचा अपेक्षित विकास झाला नव्हता. मात्र आमदार अमोल खताळ यांनी अवघ्या दीड वर्षांत साडेतीन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून अनेक विकासकामे पूर्ण केली आहेत, तर काही कामे प्रगतीपथावर आहेत. लवकरच या विकासकामांचे लोकार्पण आणि गावातील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या शिवसेना प्रवेशाचा भव्य सोहळा आयोजित करण्यात येणार आहे.



# तुकाराम मुंढेंकडून कारवाईचा धडाका, १०२ जण जेरबंद

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, भेसळयुक्त आणि असुरक्षित अन्नपदार्थांविरोधात अन्न आणि औषध प्रशासनाने २५ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत राज्यव्यापी धडक मोहीम राबवत मोठी कारवाई केली.



अहिल्यानगर तोफखाना पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या मावा व सुगंधी तंबाखू बनवणाऱ्या २ ठिकाणांवर छापे टाकण्यात आले. या कारवाईत ३,३४,७५०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या मोहिमेत १०३ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान १०२ आरोपींना अटक करत ८६ आस्थापना सील करण्यात आल्या आहेत. अन्न आणि औषध प्रशानाच्या एकूण १ कोटी ५८ लाख २८ हजार ६७७ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर विभागात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर विशेष कारवाई करण्यात आली. या मोहिमेत राज्यभरातील अनेक ठिकाणी छापे टाकून गुन्हे दाखल करण्यात आले.

एफडीएने भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा आणि मानके कायद्यातील कलम २६, २७, ३०(२)(अ) आणि ५९ अंतर्गत गुन्हे नोंदवून १०२ आरोपींना अटक केली. या कारवाईत ३४ लाख ०५ हजार ०४८ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व पानमसाला साठा जप्त करण्यात आला. गुटखा-पानमसाला विरोधातील कारवाईत कोकण विभाग आघाडीवर राहिला. या विभागात ४७ आस्थापनांवर छापे टाकून ४६ जणांना अटक करण्यात आली. मुंबई विभागात २२ कारवाया केल्या. या प्रकरणात २३ आरोपींना अटक करण्यात आली. गुटखा-पानमसाल्यावरील कारवाईसोबतच एफडीएने मोहिमेअंतर्गत राज्यभरातील भेसळयुक्त, निकृष्ट दर्जाच्या आणि अस्वच्छ परिस्थितीत तयार होणाऱ्या अन्नपदार्थांवरही धडक कारवाई केली.

मुंबई, नवी मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक, भंडारा, जालना, बीड, नांदेड, परभणी, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम, जळगाव, रायगड आणि धुळे जिल्ह्यांमध्ये ७३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली.पुणे शहर या कारवाईत आंबे, बुंदी लाडू, खवा, बेकरी पदार्थ, कँडी, दूध व दुग्धजन्य पदार्थ, गूळ, खाद्यतेल, तूप, खजूर, आईस्क्रीम, कुल्फी, फ्रोजन डेझर्ट, मसाले, शेंगदाणा चिक्की यांसह विविध अन्नपदार्थांचा १ कोटी २४ लाख २३ हजार ६२९ रुपयांचा आणि ९०,६३९ किलो साठा जप्त करण्यात आला. संशयित नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट इशारा देताना सांगितले की, 'नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित अन्न मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांविरोधात कोणतीही दया दाखवली जाणार नाही. भेसळ, प्रतिबंधित गुटखा-पानमसाल्याची विक्री किंवा उत्पादन आढळल्यास यापुढे आणखी कठोर कारवाई केली जाईल'. एफडीएच्या या राज्यव्यापी मोहिमेमुळे प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची अवैध विक्री आणि भेसळयुक्त अन्नपदार्थांच्या व्यवसायाला मोठा आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विकसित भारताचे स्वप्न आणि हवामान संकटाचे वास्तव

भारत आज जगातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक मानला जातो. २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे स्वप्न देशाने उराशी बाळगले आहे. पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, उद्योग, संरक्षण आणि डिजिटल क्रांतीच्या माध्यमातून भारत प्रगतीच्या नव्या उंची गाठत आहे. मात्र, या प्रगतीसमोर एक मोठे आव्हान दिवसेंदिवस अधिक गंभीर होत आहे आणि ते म्हणजे हवामान बदलाचे संकट. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा, पूर आणि चक्रीवादळे यांची वारंवारता वाढत असल्याने लाखो कुटुंबांचे जीवन आणि उपजीविका धोक्यात येत आहेत.

महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांमध्ये गेल्या काही वर्षांत हवामानातील अनिश्चिततेचे तीव्र परिणाम दिसून आले आहेत. शेतकऱ्यांचे पीक काढणीच्या तोंडावर पावसामुळे नष्ट होते, कधी गारपिटीमुळे फळबागांचे नुकसान होते, तर कधी पाण्याअभावी पिके जळून जातात. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर आणि असंघटित क्षेत्रातील कामगार हे या संकटाचा सर्वाधिक फटका सहन करतात. हवामानातील एका धक्क्यामुळे अनेक कुटुंबे पुन्हा गरिबीच्या खाईत ढकलली जातात.

भारताकडे मनरेगा, पीएम किसान, सार्वजनिक वितरण प्रणाली, राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा यांसारख्या अनेक प्रभावी सामाजिक सुरक्षा योजना आहेत. या योजनांमुळे कोट्यवधी नागरिकांना आधार मिळतो. परंतु या योजना प्रामुख्याने दारिद्र्य आणि अन्नसुरक्षा यांसारख्या दीर्घकालीन समस्यांवर केंद्रित आहेत. हवामानाशी संबंधित अचानक उद्भवणाऱ्या संकटांना तातडीने प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक असलेली लवचिकता आणि वेग या व्यवस्थांमध्ये अद्याप पुरेशा प्रमाणात दिसून येत नाही.

आज तंत्रज्ञानाच्या युगात हवामानाचा अचूक अंदाज उपलब्ध आहे. हवामान विभाग, उपग्रह यंत्रणा आणि विविध संशोधन संस्था संभाव्य संकटांची पूर्वसूचना देतात. तरीही या पूर्वसूचनांचा उपयोग सामाजिक सुरक्षा योजनांशी प्रभावीपणे जोडला जात नाही. उदाहरणार्थ, एखाद्या तालुक्यात तीव्र दुष्काळाची चिन्हे दिसू लागल्यास तेथील शेतकऱ्यांना किंवा मजुरांना अतिरिक्त आर्थिक मदत, रोजगार किंवा अन्नधान्याची सुविधा आपोआप सुरू होणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात नुकसान झाल्यानंतर पंचनामे, कागदपत्रे आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच मदत मिळते. तोपर्यंत अनेक कुटुंबांचे मोठे नुकसान झालेले असते.




आजच्या वास्तवात हवामान बदल हा केवळ पर्यावरणाचा विषय राहिलेला नाही. तो अर्थव्यवस्था, शेती, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक न्याय यांच्याशी थेट जोडलेला आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करायचे असेल, तर केवळ आर्थिक वाढ पुरेशी ठरणार नाही. समाजातील सर्वात असुरक्षित घटकांना संकटाच्या काळात त्वरित संरक्षण देणारी मजबूत व्यवस्था उभारावी लागेल. हवामानाशी संबंधित पूर्वसूचना आणि सामाजिक सुरक्षा योजना यांचे एकत्रीकरण ही काळाची गरज बनली आहे.

आज गरज आहे ती पारंपरिक मदत व्यवस्थेपलीकडे जाण्याची. नुकसान झाल्यानंतर मदत देण्याऐवजी नुकसान टाळण्यासाठी आणि त्याचा परिणाम कमी करण्यासाठी आगाऊ उपाययोजना करणे आवश्यक आहे. डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, हवामान डेटा आणि थेट लाभ हस्तांतरण यांचा वापर करून अधिक वेगवान आणि परिणामकारक यंत्रणा उभारता येऊ शकते. त्यामुळे संकटग्रस्त कुटुंबांपर्यंत मदत योग्य वेळी पोहोचेल आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सावरण्याची संधी मिळेल.

२०४७ चा विकसित भारत हा केवळ मोठ्या अर्थव्यवस्थेचा भारत नसावा, तर प्रत्येक नागरिकाला सुरक्षितता, संधी आणि सन्मानाने जगण्याची हमी देणारा भारत असावा. हवामान बदलाच्या वाढत्या संकटाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक सुरक्षा व्यवस्थेचे आधुनिकीकरण करणे ही केवळ धोरणात्मक गरज नसून राष्ट्रीय प्राधान्याची बाब आहे. कारण विकासाचा खरा अर्थ तेव्हाच पूर्ण होतो, जेव्हा प्रगतीचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो आणि कोणतेही संकट त्याला पुन्हा मागे ढकलू शकत नाही.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
ताम्हाणे हॉस्पिटल
अधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
आजचा संपर्क करा- 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com



पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
CorelDRAW Ps Ai Id
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005





भंडारी
विवाह
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेझर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# 'IMA' राज्याच्या विविध समित्यांवर संगमनेरचे तीन डॉक्टर्स

## डॉ. एकता डेरे-वाबळे, डॉ. अमोल पाठक आणि डॉ. विकास पाचोरे यांचा राज्यस्तरीय गौरव


डॉ. एकता डेरे-वाबळे


डॉ. अमोल पाठक


डॉ. विकास पाचोरे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : इंडियन मेडिकल असोसिएशन **(IMA)** महाराष्ट्र राज्याच्या विविध राज्यस्तरीय समित्यांवर संगमनेरच्या तीन मान्यवर डॉक्टरांची निवड झाल्याने वैद्यकीय क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. डॉ. एकता डेरे-वाबळे, डॉ. अमोल पाठक आणि डॉ. विकास पाचोरे यांची राज्यातील महत्त्वाच्या समित्यांवर नियुक्ती करण्यात आली असून, संगमनेरच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी ही अभिमानास्पद बाब मानली जात आहे.

संगमनेरमधील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. एकता डेरे-वाबळे यांची खच- महाराष्ट्राच्या झउझछउ्ढ समितीवर कार्यकारी सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. वैद्यकीय सेवेसोबतच सामाजिक जनजागृती, महिलांच्या आरोग्यविषयक उपक्रम आणि विविध वैद्यकीय मोहिमांमध्ये त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ राज्यस्तरीय समितीच्या कामकाजाला होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

तसेच संगमनेरमधील ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. अमोल पाठक यांची खच- महाराष्ट्राच्या सार्वजनिक आरोग्य जनजागृती समितीवर (झींलश्रळल क्शरश्रींह -ुरीशपर्शीी उाािळीींशश) कार्यकारी सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, आरोग्यविषयक जनजागृती आणि समाजाभिमुख वैद्यकीय उपक्रमांमध्ये त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आली आहे.

याचबरोबर डॉ. विकास पाचोरे यांची खच- महाराष्ट्राच्या आरोग्य व कल्याण समितीच्या राज्य कार्यकारिणी सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. रुग्णसेवा, आरोग्यविषयक उपक्रम आणि संघटनात्मक कार्यातील त्यांच्या सक्रिय सहभागामुळे त्यांना ही महत्त्वपूर्ण जबाबदारी देण्यात आली आहे. संगमनेर आयएमए शाखेच्या इतिहासात एकाच वेळी तीन डॉक्टरांची राज्यस्तरीय समित्यांवर निवड होणे ही उल्लेखनीय घटना मानली जात आहे. यामुळे संगमनेरमधील वैद्यकीय सेवांचा दर्जा, डॉक्टरांचे कार्य आणि समाजाभिमुख आरोग्य चळवळींचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

राज्यभरातील आरोग्यविषयक धोरणे, जनजागृती उपक्रम, महिलांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापन आणि वैद्यकीय क्षेत्रातील विविध विषयांवर या तिन्ही डॉक्टरांना काम करण्याची संधी मिळणार आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा लाभ राज्यातील नागरिकांना होईल, असा विश्वास खच- महाराष्ट्र राज्याच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

संगमनेर आयएमए शाखेचे संस्थापक तथा इंडियन मेडिकल असोसिएशनच्या राष्ट्रीय स्तरावरील केंद्रीय कार्यकारिणी समितीचे सदस्य डॉ. एम. डी. घुले, संगमनेर आयएमए शाखेचे अध्यक्ष डॉ. योगेश गेठे, उपाध्यक्ष डॉ. जगदीश वाबळे, सचिव डॉ. किशोर गाढवे आणि खजिनदार डॉ. निकुंज दातीर यांनी तिन्ही डॉक्टरांचे अभिनंदन केले आहे.

संगमनेरच्या वैद्यकीय क्षेत्राचा राज्यस्तरावरील वाढता प्रभाव या नियुक्त्यांमधून स्पष्ट होत असल्याची भावना वैद्यकीय क्षेत्रातून व्यक्त करण्यात येत आहे.

# काजवा महोत्सवात पर्यटकांना लुटणारी टोळी राजूर पोलीसांकडून जेरबंद


छाया – विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - भंडारदरा परिसरात सुरू असलेल्या काजवा महोत्सवासाठी आलेल्या पर्यटकांच्या गर्दीचा फायदा घेत चोरी करणाऱ्या सात आरोपींना राजूर पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद करत १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

गुरुवारी (दि. ४) पहाटे सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास पांजरे येथील विलसन व्हॅली कॅम्पिंग येथे ही घटना घडली. पर्यटक प्रकाश यादव हे टेंटमध्ये झोपलेले असताना आरोपींनी टेंटमध्ये प्रवेश करून त्यांचा आर्या कंपनीचा लॅपटॉप व मोबाईल फोन असा एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

या प्रकरणातील आरोपी गणेश मेमाणे (वय १९), सोनू केकरे (वय २१), राहुल घारे (वय २३), करण घोडे (वय १९), समाधान शेणे (वय २१), रोहित घोडे (वय १९) व अजय खादे (वय २०) हे सर्व इगतपुरी व अकोले तालुक्यातील विविध गावांतील रहिवासी असल्याचे समोर आले आहे.

चोरीची माहिती मिळताच प्रकाश यादव यांनी तत्काळ ११२ क्रमांकावर संपर्क साधला. त्यानंतर राजूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विलास माळवदे, पोलीस कर्मचारी नरोडे यांनी घटनास्थळी धाव घेतली. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा माग काढत त्यांना अल्पावधीत अटक केली. आरोपींकडून चोरीस गेलेला लॅपटॉप व मोबाईल असा सुमारे १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी प्रकाश यादव यांनी राजूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विलास माळवदे, पो. हे. कॉ. एस. बी. नरोडे, पो. हे. कॉ. वाय. एन. जाधव, पो. कॉ. संभाजी सांगळे व पो.कॉ. लक्ष्मण मुठे हे करीत आहेत. काजवा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांनी सतर्कता वाढविली असून, गुन्हेगारांवर कठोर कारवाईचा इशाराही दिला आहे.

# भाजप सत्तेसाठी कोणत्याही थराला जाऊ शकतो - बाळासाहेब थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भाजप पक्षाला लोकशाही, संविधान याच्याशी काहीही देणेघेणे नाही, केवळ सत्ता महत्वाची असते. सत्तेसाठी इतर पक्षातील नेत्यांना फोडून विजयाचा गुलाल उधळला जात असून हा प्रकार निश्चितच लोकशाहीसाठी चांगला नाही. असा टोला काँग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी भाजपला लावला.

विधानपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्राजक्त तनपूरे यांना फोडून भाजपने आपल्या सोबत घेतले. त्यानंतर विरोधकांवर दबाव टाकून त्यांना बिनविरोध निवडून आणले या पार्श्वभूमीवर बाळासाहेब थोरात यांनी भाजपच्या या कार्यपद्धतीवर राजकीय खेळीवर टिका केली. केंद्रात सत्तेवर आल्यापासून स्वायत्त यंत्रणांचा गैरवापर करून विरोधक व विरोधी पक्षांवर सुडबुध्दीने कारवाई करून भाजप मोठा होत आहे. अहिल्या नगर जिल्ह्यातही भाजपने हेच केले. त्यामुळे आज येथे भाजपमध्ये सर्व मोठे नेते हे काँग्रेस पक्षाचेच दिसत आहे बाळासाहेब थोरात म्हणाले.


INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शून्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✲ कर्ज रक्कम वाढ । ✲ कर्ज व्याजदर कमी । ✲ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता



चैतन्य हॉस्पिटल
24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait. Neither DO WE
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर



अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
१ लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13



दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जानता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605



कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25